# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ३०/०५/२०१९

## मा. महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०१

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. ०७/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा दि. ०७/०६/२०१९ सभा सुचना क्र. ०१

विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | प्रश्नोत्तरे - |
| -- | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| १ | दि. ०३/११/२०१८, दि. १९/०१/२०१९, दि. १३/०२/२०१९ (दि. १९/०१/२०१९ रोजीची तहकुब सभा) व दि. १४/०२/२०१९ (दि. १९/०१/२०१९ व दि. १३/०२/२०१९ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| २ | रस्ते, चौक नामकरण प्रस्तावास मान्यता देणेबाबत. |
| ३ | सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवण रोपांची लागवड करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत. |
| ४ | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/२०१६ पासून सुधारीत वेतनसंरचना (सातवा वेतन आयोग) लागु करणेबाबत. |
| ५ | सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेसाठी मौजे चेणे स.क्र. १०१पै. ची मंजूर विकास योजनेत १२.०० मी. रुंद पोच रस्त्यासाठी प्रस्तावित करणेबाबत. |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, पाली - लाईट हाऊस - चवळी, काशी जनता नगर, शांतीनगर सेक्टर - ०७ व शांतीनगर सेक्टर - ११ येथील पाणी पुरवठा पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ७ | भाईंदर (प.) येथील सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यत रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| ८ | मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. |
| ९ | सन 2017-18 च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षिकांचे मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग आस्थापनेवर समायोजनाबाबत. |
| १० | राष्ट्रीय महामार्ग क्र. 08 वर फुट ओव्हर ब्रीज बांधणे कामाबाबत. |
| ११ | सन 2019-20 या आर्थिक वर्षाकरिता डास नाशके, अळी नाशके खरेदी करणे कामाची निवीदा मागविणेबाबत. |
| १२ | नवीन खेळणी, बँचेस व्यायाम साहित्य, लाल माती खरेदी करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. |
| १३ | विकास कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १४ | शहरात महत्वाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविणे व त्याकरिता कंट्रोल रुम तयार करणे. |
| १५ | अग्निशमन विभागाकरिता 90 मीटर उंचीची लॅडर वाहन (ALP) खरेदी करणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. |
| १६ | घोडबंदर किल्ला परिसरातील जागा सुशोभिकरण करणे कामाबाबत. |
| १७ | मा. महासभा दि. 26/02/2018 ठराव क्र. 81 नुसार फेरबदल प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्याने अटीशर्ती ठरविणेबाबत. |
| १८ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता दैनंदिन संचलन देखभालीसाठी देणेस मान्यता मिळणेबाबत. |
| १९ | मा. महासभा ठराव क्र. 60 दि. 20/02/2018 च्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संस्थांच्या कर आकारणी फेर निर्णय घेणेबाबत. |

| | |
|---|---|
| २० | वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल खरेदी व SNCU करीता आवश्यक मनुष्यबळकारीता येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| २१ | मिरा भाईंदर महापालिकेतर्फे महापौर वर्षा मॅरेथॉन आयोजन करणे. |
| २२ | सार्वजनिक शौचालये व मुतारी यांचे दैनंदिन संचलन, देखभाल दुरुस्ती करणेकरिता धोरण ठरविणे. |
| २३ | पाईप लाईन टाकणेकरीता जागा संपादित करणे |
| २४ | शहरातील उद्याने बगीचा, मैदाने, दुभाजक हे देखभाल, दुरुस्ती, सुरक्षा, झाडे लावणे, जगविणे, खेळणी दुरुस्ती करणे, रंगरंगोटी करणे इत्यादी कामाचे धोरण ठरविणेबाबत |
| २५ | घनकचरा कर चालु वर्षात सुट देणे व पुढील आर्थिक वर्षाकरिता आकारणी बाबत धोरण ठरविणे. |
| २६ | शहरातील पक्षी, प्राणी यांच्यावर उपचार करणा-या (जीवदया) सस्थांना देखभाल दुरुस्तीकरिता मानधन देणे. |
| २७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आंदोलन कर्त्यांसाठी जागा निश्चित करणेबाबत. |
| २८ | बी.एस.यु.पी. कामाबाबत नविन अटीशर्ती ठरविणे. |
| २९ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील नवजात बालकांना गरज वाटल्यास व्होकार्ड हॉस्पिटल मध्ये एन.आय.सी.यु विभागात व इतर रुग्णांना मनपा 25% हिस्सातून सुविधा उपलब्ध करुन देणे. |
| ३० | मिरारोड मधील आरक्षण क्र. २०१ येथे स्पोर्टस कॉम्पलेक्स बांधणे व मैदान उपलब्ध करुन देणे. |
| ३१ | मिरा भाईंदर शहरामध्ये मार्केट किंवा इतर सार्वजनिक हिताकरीता आरक्षण नसलेली जागा मोबदला देवून ताब्यात घेणेची कार्यवाही करणेबाबत. |
| ३२ | शाळेचा आरक्षण क्र. ११५ नविन धोरण प्रमाणे विकसित करणेबाबत व हाऊसिंग फॉर डिसहाऊसिंगमध्ये विकासकाला परवानगी देणेबाबत. |
| -- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे - |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ३० मे, २०१९

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## मा. महासभा दि. ०७/ ०६/2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ०२ )** :- रस्ते चौक नामकरण प्रस्तावास मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक, वास्तु यांना मा.महासभेच्या मान्यतेने वेळोवेळी नावे देण्यात येत असतात. सद्यास्थितीत नामकरणासाठी खालील प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1) | भाईंदर (पुर्व) इंद्रलोक आरक्षण क्र.218, 219 समोरील चौक | हिन्दु हृदय सम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे चौक |
| 2) | भाईंदर (पुर्व) गोडदेव फाटक रोडवरील चौक (अभिनव शाळा रस्ता) | अभिनव विद्या मंदिर गोडदेव चौक |
| 3) | मिरारोड (पुर्व) अयप्पा मंदिर जवळील बस स्टॉप | बापा सिताराम बस स्टॉप |
| 4) | मिरारोड (पुर्व) रामदेव पार्क, सहकार हाईट्स व ओस्वाल अॅव्हेन्यु इमारती समोरील चौक | श्रीराम चौक |
| 5) | मिरारोड (पुर्व) शांतीपार्क आर.जी. जागा | जय गोपाळ उद्यान |
| 6) | हटकेश येथील बस स्टॉप क्र.22 चौक | भजन महर्षी स्वर्गीय परशुराम रामचंद्र पांचाळ बुवा चौक |
| 7) | रामदेव पार्क उद्यान श्वेता रेसिडेन्सी समोरील चौक | श्री. हरी राधे राधे चौक |
| 8) | पांडुरंगवाडी सिग्नल चौक | डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक |
| 9) | मिरारोड (पुर्व) प्र.स.क्र.04 लक्ष्मी पार्क, पार्क व्हयु येथील चौक | श्री. संत गाडगे महाराज चौक |
| 10) | काशिमिरा उड्डाणपुलखालील उद्यान | संत रविदास महाराज उद्यान |
| 11) | घोडबंदर रा.म.क्र.08 चौक | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| 12) | मिरागाव आरक्षण क्र.357 उद्यान | स्वातंत्र्य सेनानी कै. मोतिराम जाबर उद्यान |
| 13) | तीर्थ प्लाझा व तिवारी कॉलेज समोरील चौक | शिक्षण सम्राट श्री लल्लन तिवारी चौक |

| | | |
|---|---|---|
| 14) | पांडुरंगवाडी कक्कर पॅराडाईस ते श्री.प्रभाकर म्हात्रे घरापर्यंत चा रस्ता | स्व.श्री. पद्माकर म्हात्रे मार्ग |
| 15) | जैसलपार्क शिवसेना शाखा समोरील वाहतुक बेट / उद्यान | माँ बेटी पार्क |
| 16) | नवघर स.नं.2/9 या जागेतील रस्ता | स्व.श्री.पांडुरंग कालीदास पाटील मार्ग |
| 17) | डेल्टा मागुन नाकोडा पांडुरंगवाडी पर्यंतचा रस्ता | स्व. श्री. अनंतराव भोईर मार्ग |
| 18) | भाईंदर (पुर्व) राहुल पार्क प्रमोद महाजन उद्यान येथील वरीष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र | अटलबिहारी वाजपेयी विरंगुळा केंद्र |
| 19) | जैसलपार्क चौपाटी रेल्वे ट्रॅक जवळील मैदान | स्व. श्री. सिताराम चौधरी मैदान |
| 20) | जैसलपार्क पाण्याची टाकी ते जय अंम्बे मंदिर, आशिर्वाद हॉस्पिटल ते ऐंजल इमारती पर्यंतचा रस्ता | स्व. श्रीम. पुष्पा चौधरी मार्ग |
| 21) | घोडबंदर गोवळादेवी मंदिर समोरील चौक | नाना शंकर शेठ चौक |

वरील नामकरण प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होणेस शिफारस आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २९/५/२०१९ वेळ २.४०
[illegible]
नोंदणी क्र. ०४ वर्ष २०१९/२०
लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-4/2019-20/DK/MG-3

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग

मा. महासभा दि.०७/०६/2019

// गोषवारा //

**प्रकरण क्र.:-03 सन 2019 मधील 33 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवण रोपांची लागवड करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र शासनाच्या सन 2017 ते 2019 या वर्षा मध्ये जुन-जुलै महिण्यात 3 वर्षाच्या कालावधी मध्ये 50 कोटी वृक्ष लागवड करण्याचा उद्दीष्टे आहे. त्यानुसार सन 2019 मध्ये 33 कोटी वृक्ष लागवड करणेकामी कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असून त्याचे नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करण्याबाबत मा.मंत्री, वने व महसूल, यांनी दि.26/06/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

तसेच मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष 50 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम, ठाणे, यांनी वृक्ष लागवडीचे यंत्रणानिहाय व कार्यलय निहाय वृक्ष लागवडीचे उध्दिष्ठ वाटप करण्यात आलेले असून मिरा भाईंदर महानगरपालिका करिता एकुण 60 हजार वृक्ष लागवडीचे उध्दिष्ठ देण्यात आलेले असून क्रमांक/33कोवृला/कावि-399/2018 दि.01/10/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर उध्दिष्टांच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सन 2019 मध्ये मोठया प्रमाणावर कांदळवण (Mangroves) व वनीकरणाच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर शहराला मोठया प्रमाणात सागरी किनारा लाभलेला आहे. सागरी किनारपटटीलागत मोठया प्रमाणात (Mangroves) कांदळवणाची वाढ चांगल्या प्रकारे होते. खा-या पाण्यात सर्वसाधरणपणे भरतीच्या पाण्याच्या पातळीपासुन ते ओहीटीच्या पाण्याच्या पातळीदरम्यान पटटयात ही कांदवळण आढळते. या वनस्पतीची पाने चिवट व हिरवीगार असतात. कांदवळणाची लागवड दलदलयुक्त् क्षार जमीन व दुषित पाणी असेलेल्या ठिकाणी वाढ चांगली होते.

कांदळवण हे जमिन आणि समुद्र यामधील बफर झोनचे काम करत असुन भरती ओहोटीमुळे होणा-या जमिनीची धुप थांबवते. तसेच कांदळवण हे समुद्रातील विविध जातीचे संरक्षण व संवर्धनाचे काम करते व जागतिक तापमान वाढीमुळे होणा-या नैसर्गिक आपत्तीपासुन संरक्षण करण्याचे काम करते.

कांदवळणाच्या दाट झाडीमुळे समुद्र व जमीन तसेच खाडी किनार व त्यावरील प्रदेश यांत एक हिरवी भिंत निर्माण होते त्यामुळे किना-या जवळच्या जमिनीची पाण्यापासनु होणारी धुप थांबते. भुसंरक्षणाच्या दृष्टिने या वनस्पती अतिशय महत्वाच्या आहेत. कांदवळणामुळे (Mangroves) इतर वनस्पती व जीवसृष्टिचे संरक्षण होते. जलचर प्राण्यांना संरक्षण मिळते. मासे,खेकडे,झिंगे वैगरे प्राणी येथे अंडी घालतात पिल्ली मोठी झाली कि समुद्राकडे जातात. कांदवळणाची (Mangroves) वने असलेल्या सर्व ठिकाणी सागरी लाटांपासुन संरक्षण मिळते त्यामुळे ख-या अर्थाने ते तटरक्षकाची भुमिका चोख बजावतात. त्यामुळे जैवविविधते (Bio- Divercity) मध्ये वाढ होते एकंदरीत संपुर्ण जीवन साखळी या भागात आकाराला येऊ शकते त्यासाठी खाडीचा भाग कांदवळणाने समृध्द राहणे आवश्यक आहे. तसेच बॅक वॉटर, खाडी या भागात केवळ कांदवळणाच्या अस्तित्वामुळे किती जैवविविधता असु शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे पश्चिम बंगालचा सुंदरबन प्रदेश आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवणांची लागवड करुन निगा व देखभाल करणे आवश्यक आहे.

सन 2011 मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षगणना करण्यात आलेली होती त्यानुसार मिरा भाईंदर शहराच्या उत्तर, दक्षिण-पश्चिम आणि उत्तर-पुर्व भागात कांदवळणाच्या एकुण 10 प्रजातीसह **20.7 $Km^2$ क्षेत्र** कांदवळणाचे आढळुन आलेले असुन सदर ठिकाणी खालीलप्रमाणे कांदवळणाची जाती आढळुन आलेल्या आहेत.

| Sr.no | Botanical Name | Common Name |
|---|---|---|
| 1 | Avicennia marina ( Forsk ) Vierh | Tivar |
| 2 | Excoecaria agallocha . | Huri, Geva, Phungi |
| 3 | Rhizophora mucronata Lamk | Kandal |
| 4 | Avicennia officinalis Linn. | Tivar |
| 5 | Ceriops tagal ( per) C. B. Robinson | Kirkiri |
| 6 | Agiceras corniculatum (L.) Blanco | Sugandha |
| 7 | Sonneratia apetala Buch. Ham | Chipi |
| 8 | Bruguieraq cylindrical ( L.) Bl. | Kandal |
| 9 | Lumnitzera racemosa Wild | -- |

11

पर्यावरण संरक्षण व प्रदुषण नियंत्रण् कायदा 1986 अन्वये प्रदुषणमुक्त्, आरोग्य पुर्ण जीवन जगणे हा प्रत्येक नागरीकाचा हक्क् आहे. या गोष्टीसाठी पुरक म्हणुन शासनाने विविध कायदे केले असुन त्या सर्वाचा समावेश करणारा पर्यावरण (संरक्षक) अधिनियम 1986 हा अतिशय महत्त्वपुर्ण असा कायदा आहे.

कांदळवणाचे संरक्षण् व संवर्धन करण्यासाठी मा. उच्च् न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. 3246/04 मध्ये दिनांक 06/10/2005 रोजी आदेश पारित केले आहेत. त्याअनुषंघाने महाराष्ट्र शासनाने, दि. 21/10/2005 रोजी शासन परिपत्रक निर्गमित केले आहे. तसचे कांदळवण संवर्धनाबाबत मा. उच्च् न्यायालयाने वेळोवेळी आदेश पारित केले आहेत.

सन 2018 -19 या आर्थिक वर्षात **"वृक्षारोपन / सामाजिक वनिकरण/निसर्ग उद्यान" / "कांदळवण लागवड"** या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी सन 2019 मधील 33 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवण रोपांची लागवड करणेकामी निविदा मागविणे व त्याकामी येणाऱ्या कामाच्या रु. 1.00 कोटी खर्चास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 9 ७/0 ९/२० १९ वेळ. 02:30 at
~~मा. स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. e3 वर्ष :- २०१८-१९

9/07/2019

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७ / ०६ /2019

## गोषवारा

०४
विषय :- महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2019 अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि.01/01/2016 पासुन सुधारीत वेतनसंरचना (सातवा वेतन आयोग) लागु करणेबाबत

शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक-वेपुर-2019/प्र.क्र.1/सेवा-9, दि. 30 जानेवारी, 2019 नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2019 अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि.01/01/2016 पासुन सुधारीत वेतनसंरचना (सातवा वेतन आयोग) लागु करणेबाबत शासनाचे निर्देश आहेत.

तसेच या नियमांनुसार वेतननिश्चितीच्या परिणामी शासकीय कर्मचाऱ्यास 1 जानेवारी 2016 ते 31 डिसेंबर 2018 (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीतील वेतनाच्या अनुज्ञेय थकबाकीची रक्कम आर्थिक वर्ष सन 2019-2020 पासुन पुढील पाच वर्षात पाच समान हप्त्यांत शासकीय कर्मचाऱ्यांच्या यथास्थिती, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी किंवा लागू असणाऱ्या निवृत्तिवेतन योजनेच्या खात्यामध्ये जमा करावयाच्या थकबाकीसंदर्भात शासन स्वतंत्र आदेश निर्गमित करेल, असे नमुद आहे. त्यानुसार सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करणे उचित होईल.

शासन निर्णय, वित्त विभाग, मभवा-2019/प्र.क्र.2/सेवा-9, दि. 1 फेब्रुवारी, 2019 अन्वये सुधारीत वेतन संरचनातील (सातवा वेतन आयोग) मुळ वेतनावर व योग्य त्या फरकासह सुधारीत दराने महागाई भत्ता तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, घभाम-2019/प्र.क्र.2/सेवा-5, दि.5 फेब्रुवारी, 2019 अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणीच्या आधारे सुधारीत दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यात आलेला आहे.

दि.01 जानेवारी, 2016 रोजी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 1586 अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. सदर अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागु केल्यानंतर फक्त वेतनावर अंदाजे 22% पर्यंत खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. सदर सातव्या वेतन आयोगाची सन 2019-20 या अंदाजपत्रकात तरतुद प्रस्तावित केलेली आहे.

शासन निर्णय क्रमांक :- सेनिवे-2019/प्र.क्र.58/सेवा-4, दि.24/01/2019 नुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनामध्ये सुधारणा करण्यासाठी श्री. के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, 2017 स्थापना केली होती. या समितीने

केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने दि.01/01/2019 च्या शासन निर्णय व दि.04/01/2019 च्या शासन शुध्दीपत्रकान्वये निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनामध्ये/कुटुंब निवृत्तीवेतना मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दि.01/01/2016 पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात/कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिका आस्थापनेवरील सेवानिवृत्तीवेतनधारक/ कुंटुंब निवृत्तीवेतनधारक यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार सुधारण करणे आवश्यक आहे.

त्यामुळे वरील शासन निर्णयानुसार महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना व महानगरपालिका आस्थापनेवरील सेवानिवृत्तीवेतनधारका/कुंटुंब निवृत्तीवेतनधारक यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार दि. 01 जानेवारी, 2016 रोजीपासून सातव्या वेतन आयोग लागु करणे व सातवा वेतन आयोगानुसार दि. 01 जानेवारी, 2019 पासून रोखीने वेतन अदा करणेस मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त यांचे मान्यतेने)

(विजयकुमार म्हसाळ)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय प्राप्त दि. 26/2/2018 वेळ 12:30
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. 903 वर्ष 2017-18
लिपीक 26/2/18
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/०५/2019

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (०५) - <u>सुर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी मौजे चेणे, स.क्र. 101पै. ची मंजुर</u> विकास योजनेत 12.00 मी. रुंद पोच रस्त्यासाठी प्रस्तावित करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे चेणे, स.क्र. 101पै. मधील 10140.00 चौ.मी. जागा सुर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी पोहोच रस्ता व जलवाहिनी टाकणेसाठी संपादित करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. सदर जागेस पोहोंच रस्ता उपलब्ध नसल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी दि.28/08/2018 च्या पत्रान्वये पोहोंच रस्ता उपलब्ध करुन मिळणेबाबत महानगरपालिकेस विनंती केलेली आहे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टिपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14 मे 1997 अन्वय मंजूर करण्यात आलेली असून, ती दि.15 जुलै 1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना ही शासन अधिसूचना क्र. टिपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25 ऑगस्ट 2000 अन्वये मंजूर झालेली असून, ती दि.15 ऑक्टोबर 2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267//08, दि.29 ऑगस्ट2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरासाठी मंजूर विकास योजनेनुसार मौजे चेणे, स.क्र. 101 ही जागा भागशः 30.00 मी. रुंद विकास योजना रस्ता व भागशः डोंगराळ भाग (HILL ZONE) मध्ये सामाविष्ट आहे.

प्रस्तावित मौजे चेणे, स.क्र. 101पै. या जागेमध्ये सुर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी दर्शविलेली जागेमध्ये जाणेसाठी पोहोंच रस्ता स.क्र. 101, हि.क्र. 4 ते 16 या जागेमधून दर्शविणे आवश्यक वाटते. सदर जागेचे 7/12 धारक श्री. जयेश हिराजी सावला व श्री. प्रकाश हिराजी सावला हे आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने एकूण क्षेत्रापैकी मागणी केलेल्या एकुण क्षेत्र 10140 चौ.मी. क्षेत्रापैकी जलवाहिनी ही ठाणे-घोडबंदर रस्त्या सन्मुख असल्याने व त्यांचे भूसंपादन एमएसआरडीसी मार्फत चालू असल्याचे समजते. तसेच मंजुर विकास योजनेत पाईपलाईनसाठी आरक्षण दर्शविण्यात येत नसल्याचे मौजे चेणे येथील जलाशयाच्या जागे पर्यंत स.क्र.101 पै., या जागेमधुन 12.00 मी. रुंदीचा पोहोच रस्ता विकास योजना रस्ता म्हणुन दर्शविणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तावित जागेत पोहोंच रस्त्यासाठी मंजूर विकास योजनेत विकास योजना रस्ता दर्शविणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. सोबत जोडलेल्या नकाशामध्ये अे ते बी प्रमाणे (ठाणे-घोडबंदर रस्ता ते जलाशय) 12.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता लाल रंगाने दर्शविलेला आहे.

सबब वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार नुसार फेरबदल करणेसाठीच्या निर्णयासाठी अहवाल मा. महासभेस सादर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
२४/5/19

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मुख्यकार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)**

**ता.जि.ठाणे, 401101**

**शिक्षण विभाग**

**मा. महासभा दि.:- ०४ / ०६ /2019**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रं. ०६ :- मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य् खरेदी करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 36 शाळा असुन त्यापैकी इयत्ता 1 ते 8 वी चे एकुण पटसंख्येनुसार 7834 विदयार्थी-विदयार्थीनी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन 2019-20 या शैक्षणिक वर्षात 10% संभाव्य् वाढ अपेक्षित आहे. सन 2019-20 या शैक्षणिक वर्षामध्ये विदयार्थी-विदयार्थीनींना शालेय गणेवश-टाय सह (प्रत्येकी-2), वहया, बॅग, स्वेटर, ओळखपत्र पुरवठा करावयाचा आहे.

वरील संदर्भिय शासन निर्णयामध्ये शासनाने पारित केलेल्या क्रमांक-डिसीटी-2316/प्र.क्र.133/का.1417 दि.5 डिसेंबर,2016 "परिशिष्ट्-अ" मधील "अ.क्र.8" येथे दर्शविण्यात आलेली "गणवेश" ही वस्तु फक्त् चालु शैक्षणिक वर्षाकरीता (सन 2018-19) वगळण्यात आलेली आहे.

परंतु मार्च 2019 नंतर लोकसभा व विधानसभा निवडणूका असण्याची शक्यता नाकारता येत नाही व निवडणूकी पुर्वी आचारसंहिता लागू शकते त्यामुळे मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणे आणि वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यात जमा (DBT) करणे आवश्यक आहे. त्याअन्वये वरील संदर्भिय विषयानुसार गणवेश, वहया, पाण्याच्या बाटल्या यावस्तु निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी करण्यास किंवा नियोजन विभागाने सन 2019-20 साठी सुधारीत शासन निर्णय दि.30/06/2019 पर्यंत पारित झाल्यास सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यास तसेच सदर शासन निर्णय जर दि.30/06/2019 पर्यंत पारित झाला नाही तर निविदेप्रक्रियेव्दारे गणवेश, वहया, पाण्याच्या बाटल्या वाटप करण्याच्या प्रक्रियेस मान्यता मिळण्यास व बॅग, शुजसाठी DBT तत्त्वावर खरेदी करण्याकरीता मुलांच्या खात्यांमध्ये थेट जमा करण्यासाठी लागणारी रक्कम अशी एकत्रित सर्व शैक्षणिक साहित्य् वाटप करण्यासाठी अंदाजीत रु.150 (एक कोटी पन्नास लाख) खर्च अपेक्षित आहे. तरी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस तसेच सदरचा विषय मा. महासभेसमोर ठेवण्यास मंजुरीस्तव् शिफारस आहे.

(दिपक पुजारी)
उप-आयुक्त
शिक्षण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

## ता.जि.ठाणे, 401101

## मा. महासभा

## सभा दि.०४/०६/2019

## // गोषवारा //

**प्र.क्र.०२ :- सन 2017-18 च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षिकांचे मिरा भाईंदर महागनरपालिका शिक्षण विभाग आस्थापनेवर समायोजनाबाबत.**

**संदर्भ :- 1) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचे दि.31/08/2018 रोजीचे पत्र.**

**2) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-01 यांचे दि.06/08/2018 रोजीचे पत्र.**

**3) मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. ठाणे यांना या कार्यालयाचे पत्र दि.23/10/2018 रोजीचे पत्र.**

**4) मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. ठाणे यांना या कार्यालयाचे पत्र दि.26/10/2018 रोजीचे पत्र.**

**5) दि.03/12/2018 रोजीची ऑनलाईन संचमान्यता.**

**6) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासन परिपत्रक क्र.एसएसएन2016/प्र.क्र.47/16/टीएनटी-2 दि.02/08/2016**

**7) जा.क्र./पाजिप/शिक्षण/आस्था/वशी/435/2019 शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद पालघर दि.08/03/2019 रोजीचे पत्र.**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात मनपाच्या एकुण 36 शाळा असुन यामध्ये मराठी, हिंदी, उर्दु व गुजराती माध्यमाच्या शाळा आहेत. यामध्ये मराठी माध्यामाच्या 21 शाळा व इतर तीन माध्यमाच्या प्रत्येकी 5 शाळा आहेत.

दि.22/10/2018 रोजीच्या मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडील समायोजनाने मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळांसाठी मराठी माध्यमांसाठी 10 शिक्षक व हिंदी माध्यमासाठी 7 शिक्षक असे एकुण 17 शिक्षक वरील आदेशानुसार शिक्षण विभाग कार्यालयात हजर झालेले आहेत. सोबत सन 2018-19 च्या संच मान्यतेनुसार व बिंदुनामावलीनुसार माध्यमनिहाय शिक्षकांच्या रिक्त् पदांची सविस्तर् माहिती सादर करीत आहे.

**संच मान्यता सन 2018-19 नुसार**

**मराठी माध्यम्** (मंजुर पदे 115)

| अ.क्र. | वर्गवारी नुसार | आरक्षित पदे | आरक्षण टक्केवारीनुसार | कार्यरत पदे | रिक्त् पदे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रिक्त् पदे | अतिरिक्त् पदे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | अनुसुचित जाती | (13 %) | 15 | 20 | - | 05 |
| 2 | अनुसुचित जमाती | (7 %) | 08 | 06 | 02 | - |
| 3 | विमुक्त् जाती (अ) | (3 %) | 04 | 00 | 04 | - |
| 4 | भटक्या जमाती (ब) | (2.5 %) | 03 | 04 | - | 01 |
| 5 | भटक्या जमाती (क) | (3.5 %) | 04 | 03 | 01 | - |
| 6 | भटक्या जमाती (ड) | (2 %) | 02 | 14 | - | 12 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | (2 %) | 02 | 00 | 02 | - |
| 8 | इतर मागास प्रवर्ग | (19 %) | 22 | 10 | 12 | - |
| 9 | सर्व साधारण खुला | (48 %) | 55 | 41 | 14 | - |
| | | | 115 | 98 | 35 | 18 |

**संच मान्यता सन 2018-19**

**हिंदी माध्यम्** (मंजुर पदे 64)

| अ.क्र. | वर्गवारी नुसार | आरक्षित पदे | आरक्षण टक्केवारीनुसार | कार्यरत पदे | रिक्त् पदे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रिक्त् पदे | अतिरिक्त् पदे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | अनुसुचित जाती | (13 %) | 08 | 01 | 07 | - |
| 2 | अनुसुचित जमाती | (7 %) | 04 | - | 04 | - |
| 3 | विमुक्त् जाती (अ) | (3 %) | 02 | - | 02 | - |
| 4 | भटक्या जमाती (ब) | (2.5 %) | 02 | - | 02 | - |
| 5 | भटक्या जमाती (क) | (3.5 %) | 03 | 01 | 02 | - |
| 6 | भटक्या जमाती (ड) | (2 %) | 01 | - | 01 | - |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | (2 %) | 01 | - | 01 | - |
| 8 | इतर मागास प्रवर्ग | (19 %) | 12 | 02 | 10 | - |
| 9 | सर्व साधारण खुला | (48 %) | 31 | 30 | 01 | - |
| | | | 64 | 34 | 30 | |

**संच मान्यता सन 2018-19**

**गुजराती माध्यम्** (मंजुर पदे 14)

| अ.क्र. | वर्गवारी नुसार | आरक्षित पदे | आरक्षण टक्केवारीनुसार | कार्यरत पदे | रिक्त् पदे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रिक्त् पदे | अतिरिक्त् पदे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | अनुसुचित जाती | (13 %) | 02 | 01 | 01 | 00 |
| 2 | अनुसुचित जमाती | (7 %) | 01 | 00 | 01 | 00 |
| 3 | विमुक्त् जाती (अ) | (3 %) | 00 | 00 | 00 | 00 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | (2.5 %) | 00 | 00 | 00 | 00 |
| 5 | भटक्या जमाती (क) | (3.5 %) | 01 | 00 | 01 | 00 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | (2 %) | 00 | 00 | 00 | 00 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | (2 %) | 00 | 00 | 00 | 00 |
| 8 | इतर मागास प्रवर्ग | (19 %) | 03 | 01 | 02 | 00 |
| 9 | सर्व साधारण खुला | (48 %) | 07 | 19 | 00 | 12 |
| | | | 14 | 21 | 05 | 12 |

(रिक्त् पदे 05 ही इतर मागासवर्गीय मधील आहेत.)

**संच मान्यता सन 2018-19**

**ऊर्दु माध्यम्** (मंजुर पदे 44)

| अ.क्र. | वर्गवारी नुसार | आरक्षित पदे | आरक्षण टक्केवारीनुसार | कार्यरत पदे | रिक्त् पदे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रिक्त् पदे | अतिरिक्त् पदे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | अनुसुचित जाती | (13 %) | 00 | 00 | 00 | 00 |
| 2 | अनुसुचित जमाती | (7 %) | 03 | 00 | 03 | 00 |
| 3 | विमुक्त् जाती (अ) | (3 %) | 01 | 00 | 01 | 00 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | (2.5 %) | 01 | 00 | 01 | 00 |
| 5 | भटक्या जमाती (क) | (3.5 %) | 02 | 00 | 02 | 00 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | (2 %) | 01 | 00 | 01 | 00 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | (2 %) | 01 | 00 | 01 | 00 |
| 8 | इतर मागास प्रवर्ग | (19 %) | 08 | 01 | 07 | 00 |
| 9 | सर्व साधारण खुला | (48 %) | 27 | 19 | 08 | 00 |
| | | | 44 | 20 | 24 | 00 |

वरील सर्व माध्यमांचा तक्ता पाहता मराठी माध्यमासाठी एकुण 115 पदे आरक्षित आहेत त्यापैकी मनपा शाळेवर 98 पदे कार्यरत आहेत व 35 पदे रिक्त् आहेत. तसेच हिंदी माध्यमाकरीता आरक्षित पदे 64 यापैकी 34 पदे कार्यरत आहेत यानुसार मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.ठाणे यांनी दि.23/10/2018 रोजीच्या पत्रानुसार खालील शिक्षकांची यादी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर समायोजनाकरीता पाठविण्यांत आलेली आहे.

# संवर्गनिहाय समायोजन करण्यास पात्र शिक्षकांची यादी

| अ. क्र. | अतिरिक्त ठरलेल्या शिक्षिकांची नावे | शैक्षणिक पात्रता | संवर्ग | नेमणूक दिनांक | निवृत्त दिनांक | एकुण सेवा | सध्याची वेतन श्रेणी | एकुण पगार | पेन्शन किंवा D.C.P.S | उर्वरीत सेवा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. अजय शंकर गांगुर्डे | H.S.C. D.ED | S.C. | 01-08-1996 | 31-07-2031 | 23 वर्षे | 9300+ 34800 | 55,000/- | पेन्शन | 12 |
| 2 | सौ. भारती अशोक कोळी | H.S.C. D.ED B.A. | S.B.C. | 16-06-2000 | 30-09-2030 | 18 वर्षे | 9300+ 34800 | 51,353/- | पेन्शन | 11 |
| 3 | सौ. देवयानी सुनिल जाधव | H.S.C. D.ED | S.T. | 01-10-2001 | 30-04-2040 | 18 वर्षे | 9300+ 34800 | 50,357/- | पेन्शन | 21 |
| 4 | सौ. श्रावणी श्रीधर चव्हाण | H.S.C. D.ED., B.A., M.A. | O.B.C. | 07-06-2002 | 31-07-2033 | 16 वर्षे | 9300+ 34800 | 51,998/- | पेन्शन | 14 |
| 5 | श्री. कैलास भगवान चौधरी | B.COM, D.ED., D.S.M. | S.T. | 01-06-2009 | 30-06-2047 | 9 वर्षे | 5200+ 20200 | 33,204/- | D.C.P.S | 28 |
| 6 | सौ. नमिता जयेश पाटील | H.S.C., D.ED., B.A. | OPEN | 16-06-2008 | 31-12-2044 | 10 वर्षे | 5200+ 20200 | 38,387/- | D.C.P.S | 25 |
| 7 | सौ. मालती महेंद्र बेलोसे | S.S.C., D.ED., B.A. | OPEN | 05-06-1996 | 30-04-2031 | 22 वर्षे | 9300+ 34800 | 55,000/- | पेन्शन | 12 |
| 8 | सौ. रेखा मिल्टन फरेरा | S.S.C., D.ED. | OPEN | 13-07-1995 | 31-08-2030 | 24 वर्षे | 9300+ 34800 | 60,000/- | पेन्शन | 11 |
| 9 | सौ. रिक्षेला मनवेल मुनीस | S.S.C. D.ED. | OPEN | 17-07-1995 | 30-09-2026 | 24 वर्षे | 9300+ 34800 | 60,000/- | पेन्शन | 7 |
| 10 | सौ. गिता जालिंदर कुंभार | S.S.C. D.ED. | OPEN | 30-11-1992 | 30-06-2024 | 26 वर्षे | 9300+ 34800 | 55,000/- | पेन्शन | 5 |

## हिंदी माध्यम

| अ. क्र. | अतिरिक्त ठरलेल्या शिक्षिकांची नावे | शैक्षणिक पात्रता | संवर्ग | नेमणूक दिनांक | निवृत्त दिनांक | एकुण सेवा | सध्याची वेतन श्रेणी | एकुण पगार | पेन्शन किंवा D.C.P.S. | उर्वरीत सेवा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सौ. रेखा प्रभाकर जगड | S.S.C., D.ED., | OPEN | 01-08-1988 | 31-08-2026 | 30 वर्षे | 9300+ 34800 | 63,081/- | पेन्शन | 7 |
| 2 | कु. प्रीती चिमनलाल राणा | H.S.C. D.ED | N.T. | 15-06-1998 | 30-11-2036 | 20 वर्षे | 9300+ 34800 | 56,089/- | पेन्शन | 7 |
| 3 | सौ. संगिता जितेंद्र हलपती | H.S.C. D.ED | S.T. | 24-06-1999 | 30-09-2035 | 19 वर्षे | 9300+ 34800 | 55,146/- | पेन्शन | 16 |
| 4 | सौ. हंसा चंद्रकांत पटेल | S.S.C. D.ED., | S.T. | 11-06-2000 | 31-03-2028 | 18 वर्षे | 9300+ 34800 | 51,353/- | पेन्शन | 9 |
| 5 | सौ. प्रज्ञा पियुष टेलर | H.S.C., D.ED., B.A. | S.T. | 12-06-2006 | 31-08-2040 | 12 वर्षे | 5200+ 20200 | 40,700/- | D.C.P.S | 21 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | सौ. वर्षा नयेन्द्र दैया | S.S.C., D.ED., | OPEN | 01-12-1991 | 31-10-2024 | 28 वर्ष | 9300+ 34800 | 61978/- | पेन्शन | 5 |
| 7 | सौ. भावना कौशिक मिस्त्री | H.S.C., D.ED., | OPEN | 12-01-2001 | 30-09-2034 | 18 वर्ष | 9300+ 34800 | 51164/- | पेन्शन | 15 |

तात्कालीन आयुक्त् डॉ. नरेश गिते यांनी खालील तक्यात नमुद शिक्षकांना शिक्षण विभाग आस्थापनेवर "उपशिक्षिका" या पदावर एकतर्फी सेवा वर्ग करुन घेण्यासंबंधी पत्र देण्यात आलेले आहे त्यानुसार संदर्भ क्रं.7 मधील पत्रानुसार खालील शिक्षिकांना महानगरपालिका यांचेकडे सेवा वर्ग करुन हजर होण्याकरीता दि.08/03/2019 रोजी कार्यमुक्त् करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | शिक्षिकांची नावे | संवर्ग | एकुण सेवा |
|---|---|---|---|
| 1 | सौ. रेखा प्रकाश करोडे | O.B.C. | 16 वर्षे |
| 2 | सौ. विदया मधुकर रुपवते | OPEN | 9 वर्षे |
| 3 | सौ.गिता गिरीष केणी | OPEN | 23 वर्षे |
| 4 | सौ. कौसल्या सत्यवान जगदाळे | OPEN | 6 वर्षे |
| 5 | सौ. सुजाता तुषार भायदे | OPEN | 10 वर्षे |
| 6 | सौ. प्रमिला दशरथ शिरस्कर | OPEN | 3 वर्षे |
| 7 | शमीम अली खान | OPEN | 16 वर्षे |

वरील तक्यात नमुद पैकी जिल्हापरिषद ठाणे मार्फत वर्ग करण्यात आलेले 17 शिक्षक व जिल्हा परिषद पालघर मार्फत वर्ग करण्यात आलेल्या 7 शिक्षकांचे भविष्यामध्ये वेतन व पेन्शन (सेवा निवृत्ती वेतन) ही 50 % मनपामार्फत व 50 % शासनाकडुन प्राप्त् होणार आहे.

तरी सदरील समायोजन यादीतील शिक्षकांना मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागात सन 2018-19 च्या संचमान्यतेनुसार व बिंदुनामावलीतील रिक्त् पदांच्या जागी समायोजन करण्याबाबत सदरचा विषय मा. महासभेसमोर ठेवण्यास पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

**उप-आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 23/04/19 वेळ 12.30 वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र ...... 08 ...... वर्ष :- 2019-20

लिपीक 23/04/2019
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# <u>मिरा-भाईंदर महानगरपालिका</u>

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि. 04 / 06 /2019**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( 90 )** :- राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वर फुट ओव्हर ब्रीज बांधणे कामाबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वर सम्राट हॉटेल, दहीसर चेक नाका येथे मा. श्री. राजन विचारे यांच्या खासदार निधीतुन फुट ओव्हर ब्रीज बांधणेसाठी 74.93 लक्ष रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. सदर फुट ओव्हर ब्रीज बांधण्याचे एकूण काम रु. 2.18 कोटी रुपये रक्कमेचे असल्याने खासदार निधी व्यतिरिक्त उर्वरीत रु.1.43 कोटी रक्कम महानगरपालिकेमार्फत खर्च करण्यास मा. महासभा दि.30/01/2016 ठराव क्र. 113 अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रकीया करुन कंत्राटदार यांना कार्यादेश देण्यात आलेले होते. दरम्यानच्या काळात राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 वरुन मिरा भाईंदर शहरासाठी मेट्रो प्रकल्प मंजूर झाल्याने सदर फुट ओव्हर ब्रीजच्या जागेची तपासणी करणे आवश्यक झाले. त्यानुसार एम.एम.आर.डी.ए व भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या कडून नाहरकत पत्र मागविण्यात आले. एम.एम.आर.डी.ए यांनी पाडुरंग वाडी सम्राट हॉटेल जवळील मेट्रो स्टेशन संपल्यावर मिरा भाईंदर कडे फुट ओव्हर ब्रीज बांधण्यास हरकत नसल्याने कळविलेले असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी सुध्दा पत्र दिलेले आहे.

दरम्यानच्या काळात फेब्रुवारी 2019 मध्ये खासदार निधीतून सदर कामासाठी दिलेली प्रशासकीय मान्यता रद्द झाल्याने दि.19/01/2019 च्या महासभेत सदर काम खासदार निधी व मनपा निधीतून करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली नाही.

सदस्थितीत सदर काम मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या निधितुन हाती घेणेबाबत मा. श्री. राजन विचारे, खासदार यांनी मागणी केली आहे. तरी सदर कामास सन 2019-20 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीतुन घेण्यास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी प्रदान होण्यास शिफारस आहे.

7/3/19

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2019-20/DK/MG-2

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०७/०६/२०१९

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. :-** ११

**विषय :-** सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता डास नाशके, अळी नाशके खरेदी करणे कामाची निविदा मागविणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे अंदाजित ७९ चौ.किमी इतके विस्तृत आहे. महानगरपालिका क्षेत्राच्या तिन्ही बाजूने खाडी / समुद्र परिसर आहे. शहरातील नागरी, औद्योगिक वसाहतीतुन सांडपाण्याचा निचरा कच्चे, पक्के नाले व गटारातून खाडी / समुद्रात होत असतो. खाडी/समुद्रात सांडपाण्याचा निचरा होत असलेल्या ठिकाणी खाडीच्या पात्रात मोठयाप्रमाणात कांदळवणे आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संथगतीने होत असतो. शहरातील मोकळया जागेत (ओपन प्लॉट) पावसाळया दरम्यान मोठया प्रमाणात पावसाचे पाणी जामा होऊन डबकी निर्माण होत असतात. त्याचप्रमाणे एकात्मिक नाले बांधणी अंतर्गत शहरामधील कच्चे नाले पक्क्या नाल्याच्या स्वरुपात बांधणेकामी बांधकामे, भुयारी गटार योजना बांधकामे इत्यादी सुरु असल्याने, ठिक ठिकाणी गटारे / नाल्यातील सांडपाण्याचा प्रवाह अडवून कामे पुर्ण करण्यात येत असतात.

एकंदर शहराची भौगोलिक रचना पाहता तसेच शहरातील वरील सर्व परिस्थितीमुळे मोठयाप्रमाणावर डासांची उत्पत्ती होवून डासांचा प्रदुर्भाव होत असतो. सदरचा डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणे कामी शहरात डासनाशकाची व अळीनाशकांची मोठयाप्रमाणावर फवारणी करणे आवश्यक असुन दरवर्षी प्रमाणे विविध नामांकित कंपनीची डास नाशके व अळीनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका क्षेत्रात फवारणी करणेकरीता डास नाशके, अळी नाशके व इतर आवश्यक साहित्य खरेदी करणे कामी सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात "एकात्मिक डास निर्मुलन योजना/ठेका कर्मचारी" या लेखाशिर्षाखाली रु. ७,७५,२२,०००/- तरतुद शिल्लक आहे. उपरोक्त प्रमाणे वार्षिक निविदा मागविणेस अंदाजित रु. २,००,००,०००/- खर्च अपेक्षित असल्याने सदरचा प्रस्ताव इ-टेंडरद्वारे निविदा मागवून खरेदी करणेसाठी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता सादर.

डासनाशके, अळीनाशके व इतर आवश्यक साहित्यांची यादी सोबत जोडली आहे.

(डॉ. संभाजी पानपट्टे)
उपायुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## वैद्यकीय आरोग्य विभाग

### सन २०१९-२० करीता डासनाशके, अळी नाशके व इतर आवश्यक साहित्यांची यादी

| अ.क्र. | डास नाशके, अळी नाशकाचे नाव | वार्षिक अंदाजित परिमाण |
|---|---|---|
| १. | Alphacypermtrin 10% SC | २००० लिटर |
| २. | Deltamethrin 1.25% ULV ISI mark | ५०० लिटर |
| ३. | Bifenthrin 10% WP ISI mark | २०० किलो |
| ४. | Cyfluthrin 5%EW | २००० लिटर |
| ५. | Deltamethrin 2.5% SC | २००० लिटर |
| ६. | Temephos 1% SG | १०००० किलो |
| ७. | Diflubenzeron 2% Tablet | २०० किलो |
| ८. | Diflubenzeron 25%WP | २०० किलो |
| ९. | Betacyfluthrin 10.5% + Imidacloprid 21% SC | ५०० लिटर |
| १०. | Jet Spray Machine | ०५ |
| ११. | Lambda Cyhalothrin 9.7% CS | ५०० लिटर |
| १२. | M.L.O. Oil | १०००० लिटर |
| १३. | Malathion 50% EC | ५०० लिटर |
| १४. | Novaluron 10% EC | २०० लिटर |
| १५. | Polydimethylsioxane (PDMS) 70% | २०० लिटर |
| १६. | Propoxure 2% Bait | १०० किलो |
| १७. | Propoxure 20% E.C (ISI Mark) | ५०० लिटर |
| १८. | Bacillus thurginsis var Isreaelensis 5 % WP (NVBDCP Apporved) | १००० किलो |
| १९. | Pyrethrum 2% Ettract (ISI Mark) | १००० लिटर |
| २०. | Pyrosene Oil E ISI mark | ५००० लिटर |
| २१. | Temephos 50% EC ISI mark | ३००० लिटर |
| २२. | Fogging Machine | ३० |

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**बांधकाम विभाग**

**मा. महासभा दि.०७/०६ /2019**

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (१६ ) :-** घोडबंदर किल्ला परीसरातील जागा सुशोभिकरण करणेकामाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ला हा पर्यटन सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक योजना अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस संगोपनार्थ देण्याबाबत दि.12 फेब्रुवारी 2019 रोजी शासन निर्णयात जारी करण्यात आलेला आहे. घोडबंदर किल्ला व परीसराची एकूण 7 हेक्टर आर 5 गुंठे ही जागा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने स्मारक म्हणून संरक्षित केलेली आहे. घोडबंदर किल्ल्याचे संवर्धन, दुरूस्ती करण्यासाठी आवश्यक प्रक्रीया करून कंत्राटदार नेमण्यात आलेला आहे. सदर जागा शासनाकडून करारनामा करून ताब्यात दिल्यावर सदर काम सुरू करण्यात येईल.

दरम्यानच्या काळात सदर किल्ला सभोवताली असलेला परिसर सुशोभिकरण व विकसित करणेसाठी शिवसृष्टी प्रकल्पाचा नकाशा मा. प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याशी झालेल्या चर्चेनूसार प्राथमिक नकाशा सादर करण्यात आलेला आहे. सदर कामासाठी अंदाजे रु.53.68 कोटी एवढा कोटी खर्च अपेक्षित असून शासनाकडे सदर रक्कम अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्याची तत्वत: मागणी करण्यात आलेली आहे. तरी सदर प्रकल्प हाती घेण्यास व शासनाकडून अनुदान उपलब्ध करून घेण्यासाठी मान्यता देण्यास शिफारस आहे.

७/६/२०/१९

**(बालाजी खतगांवकर)**

**आयुक्त**

मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MG-17

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## मा. महासभा दि. ०४ / ०६ /2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( ९४ ) :- मा. महासभा दि.26/02/2018 ठराव क्र. 81 नुसार फेरबदल प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्याने अटीशर्ती ठरविणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. 122 (मैदान व सामाजिक वनीकरण) मधील एकुण 46700 चौरस मीटर क्षेत्रापैकी 6000 चौरस मिटर जागा कमी एकुण 6000 चौरस मीटर क्षेत्रावर सांस्कृतिक भवन या करीता आरक्षण क्र. 122 अ अन्वये आरक्षित करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर आरक्षणाकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिका समुचित प्राधिकरण आहे.

मा. महासभा दि.26/02/2018 ठराव क्र. 81 अन्वये शासनामार्फत फेरबदल प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर अटीशर्ती ठरविण्या करीता प्रस्ताव पुन्हा मा.महासभेत ठेवण्यात यावा असे नमुद करण्यात आलेले आहे. तरी शासनाकडून मंजुर झालेल्या सांस्कृतीक भवन हे आरक्षण विकसित करण्यासाठी नियमानुसार अटीशर्ती ठरविणेस शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
7/3/19
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-M /2019-20/D.K/M-Go -1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मिळकत विभाग

## मा. महासभा दि. ०७ / ०६ /2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (१८ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता दैनंदिन संचालन देखभालीसाठी देणेस मान्यता मिळणेबाबत..

मिरा-भाईंदर महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता भाडे दराने न देता फक्त दैनंदिन संचलन, देखभाल व दुरूस्ती करीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेच्या अनुषंगाने सदर जागा मिळणेबाबत खालील संस्थेचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | मालमतेचे नाव | अर्जदाराचे नाव / संस्थेचे नाव |
|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर समाज मंदिर (व्यायाम शाळा) | मिरा भाईंदर कुस्ती संघ, भाईंदर (प.) |
| 2 | स्व. क्विंटन कोरीया व्यायाम शाळा डोंगरी, भाईंदर (प.) | डोंगरीगांव मंडळ डोंगरी भाईंदर (प.) |
| 3 | दिवस कार्य वास्तु जैसलपार्क चौपाटी भाईंदर (पु.) | आगरी समाज उन्नती संस्था नवघर भाईंदर (पु.) |
| 4 | व्यायाम शाळा गावदेवी मंदिर मुर्धागांव भाईंदर (प.) | नवयुवक मित्र मंडळ मुर्धागांव, भाईंदर (प.) |
| 5 | मनपा इमारती मधील व्यायाम शाळा मोर्वा, उत्तन रोड, भाईंदर (प.) | मे. आधार सहकारी पतपेढी मर्या. मोर्वा, भाईंदर (प.) |
| 6 | उत्तन व्यायाम शाळा, उत्तन, भाईंदर (प.) | श्री. रोहिदास पाटील, उत्तन, भाईंदर (प.) |
| 7 | योगध्यान धारणा केंद्र, जेसलपार्क, भाईंदर (पू.) | महाशक्ति जनजागृती शैक्षणीक ट्रस्ट, भाईंदर (प.) |

वरील प्रमाणे संस्थेचे / व्यक्तिचे अर्ज प्राप्त झाले असुन सदर संस्थेस दैनंदिन संचलन, देखभाल व दुरूस्तीकरिता मागणी केली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार मागणी करणाऱ्या संस्थाना तीन वर्ष मुदती करीता मालमत्ता करारानामा करून देण्यास मान्यता असावी.

(बालाजी खतगांवकर) २२/५/१९
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-M /2019-20/S.M/M-Go -1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०७/०६ /२०१९

## गोषवारा

**विषय** :- मा. महासभा ठराव क्र. ६० दि. २०/०२/२०१८ च्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संस्थांच्या कर आकारणी बाबत फेर निर्णय घेणे बाबत.

**प्रकरण क्र.** १९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना कर आकारणी करणेकरीता विचारात घ्यावयाच्या भाडे मूल्य दरा बाबत मा. महासभेने दि. २०/०२/२०१८ रोजीच्या मा. महासभेत ठराव क्र. ६० अन्वये दि. ०१/०४/२०१८ पासून उक्त भाडेमूल्य दरामध्ये वाढ केलेले आहे.

त्यानुसार महानगरपालिका हद्दीतील नविन मालमत्तांना दि. ०१/०४/२०१८ पासून कर आकारणी करताना मंजूर केलेल्या दरानुसार कर आकारणी करण्यांत येते.

तसेच मा. महासभेने सदर ठरावामध्ये महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संस्था यांचेकरीता रु. २.४०/- प्र.चौ.फु. दर नमुद करुन **महानगरपालिका हद्दीतील मालमत्तेस दि. ०१/०४/२०१८ पासून नविन कर आकारणी करताना ज्या शिक्षण संस्थेच्या स्वतंत्र इमारती असतील त्या शिक्षण संस्थांना वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे दराच्या ५०% कर आकारणी करण्यांत यावी. दि. ३१/०३/२०१८ पर्यंत कर आकारणी केलेल्या मालमत्तांचे अर्ज महानगरपालिकेस प्राप्त होतील व ज्या शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तेवर यापूर्वी आकारणी झाली असेल त्यांना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या प्रचलित दराच्या ५०% दराने दि. ०१/०४/२०१८ पासून कर आकारणी करण्यंत यावी.** असा ठराव पारीत केलेला आहे.

आयुक्त यांनी सदर प्रकरणी इतर महानगरपालिकांकडुन शैक्षणिक संस्थांना केलेल्या कर आकारणी बाबतची माहिती संकलीत करावी व त्या अनुषंगाने मा. महासभेपुढे फेरी विचार करणे बाबत विनंती करणे बाबत निर्देशित केलेले आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका नजीक असलेल्या ठाणे, भिवंडी, वसई-विरार, कल्याण डोंबीवली महानगरपालिकेस पत्र व्यवहार केला असता खालीलप्रमाणे महानगरपालिकांकडुन माहिती प्राप्त झालेली आहे.

**भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका :-** महानगरपालिका क्षेत्रातील शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तेस निवासी दराने कर आकारणी करण्यांत येते. व कुठल्याही करामध्ये सवलत देण्यांत येत नाही.

**ठाणे महानगरपालिका :-** शाळा (वाणिज्य वापर करणाऱ्या शाळा वगळून) महाविद्यालये, सामाजिक क्रिडा, सांस्कृतीक, अभ्यासिका, वाचनालये, व्यायमशाळा, पक्ष कार्यालये, इत्यादी धर्मदाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत संस्थांच्या इमारतीस मालमत्ता कर व्यावसायिक दराने न आकारता निवासी दराने आकारणी करण्यांत येते.

**कल्याण-डोंबीवली महानगरपालिका :-** महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तांना निवासी दराने कर आकारणी करण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १३२ नुसार सामान्य करात सवलत देण्यांत येते.

उपरोक्त बाबींचा विचार करता इतर महानगरपालिकांमध्ये शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तेस निवासी दराने कर आकारणी करण्यांत येते.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सद्यस्थितीत शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तेस केलेल्या कर आकारणीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर आकारणी प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १ | निवासी दराने कर आकारणी व ५०% सवलत मंजूर | १७ |
| २ | निवासी दराने कर आकारणी व ५०% सवलत नाही | ४३ |
| ३ | अनिवासी दराने कर आकारणी परंतु ५०% सवलत मंजूर | २ |
| ४ | अनिवासी दराने कर आकारणी परंतु ५०% सवलत नाही | १५ |

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शैक्षणिक संस्थांना कर आकारणी करताना वेगवेगळया दराप्रमाणे कर आकारणी करण्यांत आली असल्याने विविध शैक्षणिक संस्थामध्ये महानगरपालिका बाबत रोष निर्माण होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेची प्रतिमा मलीन होत आहे. याकरीता सर्व शैक्षणिक संस्थांना एकाच पद्धतीने निवासी दराने कर आकारणी करण्यांत यावे जेणेकरुन दुजाभाव केल्याचा असंतोष निर्माण होणार नाही.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम 'र' नुसार सदरचा विषयाबाबत चर्चा होऊन धोरण निश्चित होणेस शिफारस असे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

(दिपक पुजारी)
उप-आयुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ३०/०५/२०१९ वेळ ११:१० 
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. ०८ वर्ष :- २०१९-२०

लिपीक ३०/०५/२०१९
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**बांधकाम विभाग**

**मा. महासभा दि. ०७/०६ /2019**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक (२४ ) :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आंदोलन कर्त्यांसाठी जागा निश्चित करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात आंदोलन कर्त्यांसाठी जागा निश्चित न केल्याने आंदोलन कर्ते मुख्यालया समोरील फुटपाथ वरील जागेत बसत असल्याने व त्यांना सदर ठिकाणी जागा अपूरी पडत असल्याने त्यांची गैरसोय होत असते. तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आंदोलन कर्त्यांसाठी योग्य जागा निश्चित होणेस शिफारस आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त** १७/१/१९
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MG-16

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आपत्ती व्यवस्थापन विभाग

**मा. महासभा दि.** ०७/०६/२०१८

## ॥ गोषवारा ॥

**प्रकरण क्र.( १४ ):- <u>आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महत्त्वाच्या ठिकाणी सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे व कंट्रोल सेंटर उभारणे**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये विविध ठिकाणी सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेकामी पोलिस विभागामार्फत वारंवार मागणी महानगरपालिकेकडे करण्यात येत असते. याकामी शहरामध्ये पोलिस विभागाच्या मागणीनुसार शहरात महत्त्वाच्या ठिकाणी सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

सदरच्या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

१) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने सी. सी. टी. व्ही. कॅमेरे लावण्यात येणार आहेत.

२) पोलिस, वाहतूक विभाग आणि महानगरपालिका यांच्या गरजा विचारात घेऊन पोलिस अधिक्षक यांचे मार्फत कॅमेरे बसविण्याची ठिकाणे निश्चित करण्यात येतील.

३) या प्रकल्पामध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित केलेनंतर पुढील ५ वर्ष देखभाल व दुरूस्ती सह प्रस्ताव सादर करणे बंधनकारक असणार आहे.

४) सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिका पूर्व-पश्चिम यांना जोडणाऱ्या फ्लाय-ओव्हर खाली कंट्रोल सेंटर उभारण्यात येणार आहे.

५) सी. सी. टी. व्ही. फुटेज देखरेख व नियंत्रण बाबतची जबाबदारी पोलिस विभागाची असणार आहे.

आपत्ती व्यवस्थापन विभागा अंतर्गत "आपत्ती व्यवस्थापन साहित्य खरेदी व इतर व्यवस्था / सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे" या लेखा शिर्षाअंतर्गत रू. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. वरीलकामी सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे व कंट्रोल सेंटर उभारणे याकामी अंदाजे ९ कोटी खर्च अपेक्षित आहे. पोलिस विभागाकडून ठिकाणांची यादी प्राप्त झालेनंतर सविस्तर अंदाजपत्रक तयार करून निविदा प्रक्रिया करण्यात येईल. याशिवाय विविध कामांसाठी Item Rate मंजुरीसाठी निविदा मागविणेस व उपरोक्त कामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
3/6/18

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## बांधकाम विभाग
## मा. महासभा दि.०७/०६/२०१९
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ३१ )** :- मिरा-भाईंदर शहरामध्ये मार्केट किवा इतर सार्वजनिक हिताकरीता आरक्षण नसलेली जागा मोबदला देवून ताब्यात घेणेची कार्यवाही करणेबाबत..

